## तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

## मराठी विभाग वार्षिक अहवाल

## २०२१-२०२२

मराठी विभागामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये विविध उपक्रमाचे आयोजन केले होते. या वर्षात नियमित अध्यापन कार्यासाठी सत्रानुरूप अभ्यासक्रमाचा नियोजित आराखडा तयार करण्यात आला.

### प्रथम सत्र :

प्रथम सत्रामध्ये पुढील उपक्रम राबवण्यात आले.

### १. परिसंवाद :

विद्यार्थ्यांमधील चिकित्सक दृष्टिकोन व संभाषण कौशल्यात वाढ व्हावी यासाठी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

### २. प्रकाशन सोहळा :

दिनांक २०/११/२०२१ रोजी नवोदित कवींचे काव्यसंग्रह आणि दिवाळी अंक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

### ३. अतिथी व्याख्यान :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त दिनांक ०६/१२/२०२१ रोजी डॉ.शिवाजी गायकवाड यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. तसेच दिनांक ०९/१२/२०२१ रोजी डॉ.यमुना जाधव यांचे अतिथी व्याख्यान झाले.

### ४.मराठी भाषा संवर्धन पंधरवडा :

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२२ या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक २८/०१/२०२२ रोजी डॉ.अंकुशकुमार चव्हाण यांचे ऑनलाईन पध्दतीने व्याख्यान झाले. यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने सहभाग नोंदवला.

### ५. मराठी भाषा गौरव दिन :

वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज) जयंती आणि मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने दिनांक २५/०२/२०२२ रोजी सुप्रसिध्द साहित्यिक श्री.बालाजी मदत इंगळे यांचा 'माझा लेखन प्रवास' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

### ६. घटक चाचणी :

बी.ए.प्रथम, द्वितीय, तृतीय आणि बी.एस्सी प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या घटक चाचणी परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते.

७. या सत्रात प्रा.डॉ.प्रशांत चौधरी यांनी विविध अभ्यासपूरक उपक्रमामध्ये सहभाग नोंदवला.

१) दिनांक १५/०१/२०२२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. संशोधक मार्गदर्शकपदी निवड झाली.

८. या सत्रात प्रा.डॉ.सहदेव रसाळ यांनी विविध अभ्यासपूरक उपक्रमामध्ये सहभाग नोंदवला.

१) 'प्रिंटींग एरिया' या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये 'महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान' हा शोधनिबंध प्रकाशित (जानेवारी २०२२, इम्पॅक्ट फॅक्टर ८.०१२)

२) दिनांक १४/०१/२०२२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद मानव्य विद्याशाखांतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.संशोधक मार्गदर्शकपदी निवड झाली.

## द्वितीय सत्र :

या सत्रामध्ये निर्धारीत वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला.

### १. परिसंवाद :

विद्यार्थ्यांमधील संभाषण कौशलय व चिकित्सक दृष्टिकोन वाढावा यासाठी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

२. सुप्रसिध्द कवी, कथाकार व चित्रकार मा.श्री.राजेंद्र अत्रे यांच्या बहुआयामी लेखन प्रवासावर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २७/०३/२०२२ रोजी करण्यात आले.

### १. विद्यार्थी-पालक संपर्क अभियान :

या सत्रात मराठी विभागाअंतर्गत पालकत्वात येणाऱ्या बी.ए.-प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना संपर्क करून विद्यापीठ परीक्षा फॉर्म भरण्यासाठी प्रेरीत केले. त्याचबरोबर विद्यापीठाच्या परीक्षेच्या दृष्टीने सूचना देऊन मार्गदर्शन केले.

### ४. श्रेयांक आधारीत अभ्यासक्रम :

दिनांक १०/०५/२०२२ रोजी मराठीचा कार्यालयीन आणि उपयोजित दृष्टिकोनातून अभ्यास या विषयावरील श्रेयांक आधारीत अभ्यासक्रम राबविण्यात आला. या अभ्यासक्रमासाठी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील एकूण - १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. सदर अभ्यासक्रम चार प्रकरणामध्ये विभागला गेलेला आहे. याची विभागणी चार श्रेयांकामध्ये करण्यात आली आहे. सहभागी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ततेनंतर प्रमाणपत्र देण्यात आले.

## ५. घटक चाचणी :


बी.ए.प्रथम, द्वितीय, तृतीय आणि बी.एस्सी.प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या घटक चाचणी परीक्षांचे आयोजन करण्यात आले.

६ या सत्रात प्रा.डॉ.सहदेव रसाळ यांनी विविध अभ्यासपूरक उपक्रमामध्ये सहभाग नोंदवला

१) टिचिंग लर्निंग सेंटर रामानुजन कॉलेज, युनिर्व्हसिटी ऑफ दिल्ली यांचा 'ॲडव्हान्स्ड रिसर्च मेथडॉलॉजी' या विषयावरील रिफ्रेशर कोर्स 'ए' ग्रेडसह पूर्ण.

अशा प्रकारे शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये प्रथम सत्र व द्वितीय सत्रामध्ये अभ्यासक्रम आणि अभ्यासपूरक उपक्रमाची पूर्तता ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने करण्यात आली.

# छायाचित्रे




१.मराठी विभाग व अक्षरवेल महिला साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुस्तक प्रकाशन सोहळ्यानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी व अक्षरवेलच्या महिला प्रतिनिधी




२.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ६५ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ.शिवाजीराव गायकवाड, व्यासपीठावर संस्था प्रतिनिधी मा.शेषाद्री (अण्णा)डांगे व महाविद्यलयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी




३. मराठी विभागाच्यावतीने आयोजित काव्य संमेलन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी व शहरातील मान्यवर कवी.




४.मराठी विभाग व राष्ट्रीय कला मंच, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यार्थी साहित्य संमेलन प्रसंगी ॲड.मिलिंद पाटील, ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र अत्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी व विद्यार्थी प्रतिनिधी







५. संवाद लेखकाशी या मराठी विभाग आयोजित कार्यक्रमप्रसंगी सुप्रसिध्द लेखक बालाजी इंगळे, मा.कमलताई नलावडे, प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी व मार्गदर्शन करताना मसापचे मा.नीतीन तावडे.

६. श्रेयांक आधारीत अभ्यासक्रम उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी, व्यासपीठावर उद्घाटक डॉ.अविनाश ताटे आणि डॉ.सहदेव रसाळ.







७. मराठी विभागांतर्गत आयोजित अतिथी व्याख्यान देताना प्रा.यमुना जाधव, मोहोळ व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्रचार्य डॉ.प्रशांत चौधरी.

८. संवाद लेखकाशी या द्वितीय कार्यक्रमाप्रसंगी मा.राजेंद्र अत्रे, मसापचे मा.नीतीन तावडे, मा.कमलताई नलावडे आणि मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी.

सहाय्यक प्राध्यापक

डॉ.सहदेव रसाळ

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय कार्यालय उस्मानाबाद

५

प्राचार्य

डॉ.प्रशांत चौधरी

प्राचार्य
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय
उस्मानाबाद ४१३५०१